# पुणे महानगरपालिका
# स्थायीसमिती
# कार्यपत्रिका क्र. १४
# सभा क्र. १८, दिनांक १/७/२०२२ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची (साप्ताहिक) सभा शुक्रवार, दिनांक १/७/२०२२ रोजी, सकाळी ११.०० (अकरा) वाजता मा.महापालिका आयुक्त कार्यालय,पुणे महानगरपालिकाभवन,पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका व नगरसचिव हे उपस्थित होते. तसेच संबंधीत विषयांचे काही खाते प्रमुख उपस्थित होते.

मा. प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचेकडे स्थायी समितीचे विषय सादर करण्यात आले, त्यावर मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिले आहेत.

**उपआयुक्त विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र. ३१७**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ कार्यालयाचे नियंत्रणाखालील सिंहगडरोड, धनकवडी–सहकारनगर व वारजे–कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयांकडील माहे दि. ०१/०५/२०२२ ते दि. ३१/०५/२०२२ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ यांचे जा.क्र. उआप–३/१३९१, दि. २१/६/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**विषय क्र. ३१८**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ कार्यालयाचे नियंत्रणाखाली महापालिका सहाय्यक आयुक्त बिबवेवाडी, भवानी पेठ, कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालयांकडील माहे मे– २०२२ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र.५ यांचे जा.क्र. उआ–५/१८७९, दि. २३/६/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र. ३१९**

दि. ०६/०६/२०२२ ते दि. १२/०६/२०२२ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ३५ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी जा.क्र. मआ/अग्निशमन/२०८, दि. २३/६/२०२२ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**निर्णय : सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**हिशोब तपासणी अहवाल**

**विषय क्र. ३२०**

कर आकारणी व कर संकलन खात्याकडील पेठ खराडी सन २०१८–१९ मधील आकारणी प्रकरणांची व तदनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/६१९,दि. २७/६/२०२२ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रमांक ३, सन २०२२–२३ चा विचारासाठी.

**निर्णय : सदरचा अहवाल ऑडीट उपसमितीकडे पाठविण्यात यावा.**

**विषय क्र. ३२१**

कर आकारणी व कर संकलन खात्याकडील पेठ कोंढवा ( खुर्द ) ए फॉर्म क्र. ४२,११५ सन २०१७–१८ ए फॉर्म क्र. ९८, १२५, १३५, सन २०१९–२० फॉर्म क्र. २७३,२७४, सन २१–२२ पेठ बावधन ए फॉर्म क्र. ५५३५ सन १३–१४ मधील आकारणी प्रकरणांची व तदनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/६२०,दि. २७/६/२०२२ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रमांक ४, सन २०२२–२३ चा विचारासाठी.

**निर्णय : सदरचा अहवाल ऑडीट उपसमितीकडे पाठविण्यात यावा.**

**सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स**

**विषय क्र. ३२२**

कार्यकारी अभियंता स्वारगेट पाणीपुरवठा क्रमांक १ यांचे कार्यक्षेत्रात येणाऱ्या नव्याने समाविष्ट येवलेवाडी व इतर विविध भागात टँकरने पाणीपुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी मे. गुजर वॉटर सर्व्हिस यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र.रू. ३९,९९,७७५/– पेक्षा ०.३० % कमी ) असल्याने त्यांचेकडून र. रू. ३९,८७,७७५=६८ ची निविदा मान्य करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. अति.महापालिका आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/पा.पु /२०९, दि. २३/६/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. ३२३**

फुरसुंगी गावामध्ये दैनंदिन खेपा टँकरने पाणीपुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी जाधव ट्रान्सपोर्ट यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( पु.ग.प. र.रू. ९९,९३,४४०/– पेक्षा ०.९९० % कमी) असल्याने त्यांचेकडून र. रू. ९८,९४,४६५=३४ पर्यंत काम करून घेणेसाठी त्यांचेशी करारनामा करणेस व 'ब' पाकिट उघडलेच्या तारखेपासून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/पा.पु /२१२, दि. २८/६/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**संकिर्ण**

**विषय क्र. ३२४**

माध्यमिक व तांत्रिक शिक्षण कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडून सन २०२२–२३ या शैक्षणिक वर्षासाठी राजीव गांधी ॲकॅडमी ऑफ ई–लर्निंग स्कूल या शाळेसाठी शिक्षक व शिक्षकेतर पदांवर सहा महिने एकवट वेतनावर करार पद्धतीने घेणेस तसेच मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रात नमूद एकवट वाढीव वेतनाने मानधनावर सहा महिने करार पद्धतीने नेमणूका करणेस मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मा व तां शि/२१०, दि. २७/६/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. ३२५**

पुणे महानगरपालिका मान्य गणवेश नियमावलीनुसार वर्ग ३ व ४ चे अधिकारी/सेवकांना गणवेश व इतर साहित्यासाठी देय रक्कम रोख स्वरूपात बँक खात्यावर जमा करणेकामी गणवेश व इतर साहित्यासाठी मागील सन २०२१–२२ या वर्षाकरिता निश्चित करण्यात आलेले दर सन २०२२–२३ करिता कायम ठेवणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महापालिका आयुक्त (वि) यांचे जा.क्र. मआ/भांडार /२१३, दि. २९/६/२०२२ चे पत्र.

- पुणे महानगरपालिका मान्य गणवेश नियमावलीनुसार वर्ग ३ व ४ चे अधिकारी सेवकांना गणवेश व इतर साहित्यासाठीची देय रक्कम रोख स्वरूपात बँक खात्यावर जमा करणेकामी गणवेश व इतर साहित्यासाठी मागील सन २०२१–२२ या वर्षाकरिता निश्चित करण्यात आलेले दर सन २०२२–२३ करिता कायम ठेवणेस.
- पुणे महानगरपालिका मान्य गणवेश नियमावलीनुसार दर सन २०२२–२३ करिता वर्ग ३ व ४ चे अधिकारी/सेवकांना प्रती वर्ष देणेत येणाऱ्या साहित्याची होणारी रक्कम रोख स्वरूपात त्यांचे बँक खात्यावर जमा करणेस.
- पुणे महानगरपालिका मान्य गणवेश नियमावलीनुसार वर्ग ३ व ४ चे ज्या अधिकारी/सेवकांना सन २०२१–२३ या दोन वर्षाकरिता देय असलेल्या गणवेश व इतर साहित्यासाठीची रक्कम अद्याप अदा करण्यात आलेली नाही अशा सेवकांना सदर रक्कम रोख स्वरूपात त्यांचे बँक खात्यावर जमा करणेस.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. ३२६**

पुणे मनपा मुख्य इमारतीच्या आवारातील उद्यानामध्ये उभारण्यात येणाऱ्या छत्रपती श्री. शिवाजी महाराज यांच्या सिंहासनाधिष्ट पुतळ्यासाठीच्या चौथऱ्यास दगडी क्लॅडिंग करणे, दगडी मेघडंबरी उभारणे व तदनुषंगिक स्थापत्य विषयक कामे करणे (उदा. पाथवे करणे, रंगकाम करणे) संबंधित ठेकेदाराकडून काम करून घेणे हे काम अतितातडीची बाब म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये केल्याबाबतची माहितीबाबत खालील बाबी मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/२१४, दि. २९/६/२०२२ चे पत्र.

१) पुणे मनपा मुख्य इमारतीच्या आवारातील उद्यानामध्ये उभारण्यात येणाऱ्या छत्रपती श्री. शिवाजी महाराज यांच्या सिंहासनाधिष्ट पुतळ्यासाठीच्या चौथऱ्यास दगडी क्लॅडिंग करणे, दगडी मेघडंबरी उभारणे व तदनुषंगिक स्थापत्य विषयक कामे करणे हे काम अतितातडीची बाब म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये केल्याबाबतची बाब.

२) या कामांतर्गत अ) पुणे मनपा मुख्य इमारतीच्या आवारातील उद्यानामध्ये छत्रपती श्री. शिवाजी महाराज यांचा सिंहासनाधिष्ट पुतळ्यासाठीच्या चौथऱ्यास दगडी क्लॅडिंग करणे, दगडी मेघडंबरी उभारणे व तदनुषंगिक स्थापत्य विषयक कामे करणे हे काम ठेकेदार – मे. यशराज ग्लोबल इन्फ्राकॉन एल.एल.पी. यांचेकडून र.रू. ४९,१०,१८१=८६ (जीएसटीसह) पर्यंत '' सन २०२१–२२, महापौर निधीमधून केल्याची बाब ''.

ब) पुणे मनपा मुख्य इमारतीच्या आवारातील उद्यानामध्ये छत्रपती श्री. शिवाजी महाराज यांच्या सिंहासनाधिष्ट पुतळा बसविण्यासाठी स्थापत्य विषयक कामे करणे हे काम ठेकेदार – मे. आकार कन्स्ट्रक्शन यांचे कडून र.रू. ३,७५,८६४=६४ (जीएसटीसह) पर्यंत '' सन २०२१–२२, उए११अ१२२+ , मनपा भवन येथे विस्तारीत इमारत बांधणे व पुणे मनपा मिळकती मध्ये क्षेत्रीय कार्यालय/ प्रशासकीय इमारतीचे विस्तारीकरण करणे '' या तरतूदीमधून केल्याची बाब''.

क) असा अनु.क्र. १ साठी एकूण र.रू. ५२,८६,०४६=५० (जीएसटीसह) ( र.रू. बावन्न लक्ष शहाऐंशी हजार सेहेचाळीस पैसे पन्नास फक्त ) खर्च केल्याची बाब.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

<u>दाखल विषय</u>

**विषय क्र. ३२७ त्वर्य**

कोथरूड – बावधन क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत सर्व प्रभागातील पडीक हद्दीतील स्वच्छतेसाठी बीटस नुसार झाडणकाम करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/१९३, दि. १७/६/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. ३२८ त्वर्य**

पुणे मनपा हद्दीतील सार्वजनिक व वस्तीपातळीवरील शौचालय व मुताऱ्या छोट्या वाहनावरील हाय प्रेशर जेटींग मशीन च्या सहाय्याने यांत्रिकी पद्धतीने साफसफाई करणे या कामाकरिता कमी पडणारी रक्कम वर्गीकरणाने उपलब्ध करून देणेस मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/२१८,दि. १/७/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. ३२९ त्वर्य**

राजीव गांधी प्राणिसंग्रहालयाकडे सहा महिन्यांच्या कालावधीसाठी करार पद्धतीने एकवट वेतनावर नियुक्त करणेत आलेल्या अधिकारी/सेवकांना मुदतवाढ देणे बाबत. मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उद्यान/२१९, दि. १/७/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. ३३० त्वर्य**

सन २०२२–२३ या आर्थिक वर्षात पर्जन्यमापक यंत्रणा देखभाल व दुरूस्ती व काही ठिकाणी नव्याने बसविणे आवश्यक असल्याने या कामाकरिता कमी पडणारी रक्कम वर्गीकरणाने र.रू. १० लाख उपलब्ध करून देणेस मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आपत्ती व्यव/२२२,दि. १/७/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. ३३१ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेकडील नजीकच्या जमा खर्चाचा विचार करता रक्कम रू. ३५० कोटी १ वर्ष, ३६५ दिवस, ३६६ दिवस किंवा त्यापेक्षा कमी / जास्त कालावधीसाठी गुंतवणूक करणेस उपलब्ध होत असल्याने रक्कम रू. ३५० कोटी ७० % प्रमाणे , मे. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. संकीर्ण–२०२०/प्र.क्र.५१/२०/कोषाप्रशा–५ , दि. १३ मार्च २०२० नुसार राष्ट्रीयकृत बँकेतच ठेवणेबाबत किंवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९२ नुसार सार्वजनिक कर्जरोख्यात किंवा केंद्र सरकार, राज्य शासन, शासनाचे उपक्रम, शासनाच्या वित्तीय संस्था किंवा युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया , यांच्या कर्जरोख्यांमध्ये किंवा ऋणपत्रांमध्ये गुतवणूक करणेस, गुंतवणूकीचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना देणेस व आवश्यकता भासलेस सदरची गुंतवणूक मुदतपूर्व मोकळी करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/२३०, दि. १/७/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. ३३२ त्वर्य**

पुणे मनपाच्या मुख्य अग्निशमन केंद्र व त्यांच्या नियंत्रणातील १३ उप अग्निशमन केंद्राकडे कंत्राटी पद्धतीने फायरमन पुरविणेस मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/अग्निशमन/२२४, दि. १/७/२०२२ चे पत्र.

**निर्णय ः सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. ३३३ त्वर्य**

पुणे पेठ वारजे येथील स.नं. १३३, हि.नं. १अ/१अ/२अ/१/१ येथील रस्तारूंदी बाधित होणारी जागा ताब्यात घेणेस मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/२२६, दि. १/७/२०२२ चे पत्र.

**निर्णय ः सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. ३३४ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेकडील नजीकच्या जमा खर्चाचा विचार करता रक्कम रू. १५० कोटी १ वर्ष, ३६५ दिवस, ३६६ दिवस किंवा त्यापेक्षा कमी / जास्त कालावधीसाठी गुंतवणूक करणेस उपलब्ध होत असल्याने रक्कम रू. १५० कोटी ३०% प्रमाणे , मे. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. संकीर्ण–२०२०/प्र.क्र.५१/२०/कोषाप्रशा–५ , दि. १३ मार्च २०२० नुसार राष्ट्रीयकृत बँकेतच ठेवणेबाबत किंवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९२ नुसार सार्वजनिक कर्जरोख्यात किंवा केंद्र सरकार, राज्य शासन, शासनाचे उपक्रम, शासनाच्या वित्तीय संस्था किंवा युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया , यांच्या कर्जरोख्यांमध्ये किंवा ऋणपत्रांमध्ये गुतवणूक करणेस, गुंतवणूकीचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना देणेस व आवश्यकता भासलेस सदरची गुंतवणूक मुदतपूर्व मोकळी करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/२३१, दि. १/७/२०२२ चे पत्र.

**निर्णय ः सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन कार्यपत्रिका संपली.

**स्वाक्षरी/–xxx**
**(शिवाजी दौंडकर)**
**नगसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**दिनांक १९/८/२०२२ रोजी वृत्तांत मंजूर.**

**स्वाक्षरी/–xxx**
**(विक्रम कुमार)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**